RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : २१

दि. ०९ मे २०२६, वार : शनिवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990


# ममता बॅनर्जींना पराभूत करणारे सुवेंदू अधिकारी होणार पश्चिम बंगालचे नवे मुख्यमंत्री; आज शपथविधी सोहळा

कोलकाता : पश्रि्चम बंगालच्या नव्या मुख्यमंत्र्यांच्या नावावर अखेर शिक्कामोर्तब झालं आहे. तृणमुलच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांचा विधानसभा निवडणुकीत पराभव करणारे सुवेंदू अधिकारी (डीशिपर्वी -वहळझरीळ) हे राज्याचे नवे मुख्यमंत्री असतील. भाजपा विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली कोलकाता येथे झालेल्या नवनिर्वाचित आमदारांच्या बैठकीत सुवेंदू अधिकारी यांची भाजपा विधिमंडळ पक्षनेते म्हणून निवड करण्यात आली.


भाजपा नेत्यांच्या माहितीनुसार, पश्रि्चम बंगालमधील नव्या भाजपा सरकारचा शपथविधी सोहळा ९ मे रोजी पार पडणार आहे. सुवेंदू अधिकारी मुख्यमंत्री म्हणून पद आणि गोपनीयतेची शपथ घेतील. तत्पूर्वी, अमित शाह शुक्रवारी सकाळी कोलकाता येथे दाखल झाले. यावेळी सुवेंदू अधिकारी आणि इतर भाजपा नेत्यांनी त्यांचं स्वागत केलं.

सुवेंदू अधिकारी यांनी नंदीग्राम आणि भवानीपूर या दोन मतदारसंघांतून निवडणूक लढवून दोन्ही ठिकाणी विजय मिळविला. भवानीपूर मतदारसंघात त्यांनी टीएमसी प्रमुख ममता बॅनर्जी यांचा पराभव केला.

४ मे रोजी जाहीर झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या निकालांनंतर सुवेंदू अधिकारी हे मुख्यमंत्रिपदाचे प्रमुख दावेदार मानले जात होते. मात्र, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष सामिक भट्टाचार्य, केंद्रीय मंत्री सुकांत मजुमदार आणि माजी राज्यसभा खासदार स्वपन दासगुप्ता यांची नावेही चर्चेत होती.


निवडणुकीच्या निकालांमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप करत ममता बॅनर्जी यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्यास नकार दिला होता. मात्र, राज्यपाल आर. एन. रवी यांनी गुरुवारी विधानसभा विसर्जित केली. राज्यपाल कार्यालयाने घटनात्मक अधिकारांचा वापर करत कलम १७४(२)(ब) अंतर्गत हा निर्णय घेतल्याचं स्पष्ट केलं. या निर्णयानंतर पश्रि्चम बंगालमध्ये भाजपाच्या पहिल्या सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा झाला. तर २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपानं २०७ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवलं. तर १५ वर्षे सत्तेत असलेल्या तृणमूल काँग्रेसला ८० जागांवर समाधान मानावं लागलं.

दरम्यान, राज्यसभा खासदार हर्ष व्ही. श्रृंगला यांनी कोलकात्यात माध्यमांशी बोलताना म्हटलं की, उद्या (९ मे) बंगालमध्ये भाजपाचे नवे सरकार स्थापन होणार असल्यानं हा ऐतिहासिक क्षण आहे. गेल्या ५० वर्षांत प्रथमच राज्य आणि केंद्रात एकाच पक्षाचे सरकार असेल. बंगालच्या जनतेला अपेक्षित असलेला बदल आता प्रत्यक्षात येत आहे. आगामी काळात सुरक्षा, विकास आणि मानवता यांवर आधारित



धोरणांवर भर दिला जाईल. बंगालचा, विशेषतः उत्तर बंगालमधील दार्जिलिंग प्रदेशाचा खासदार म्हणून, या ऐतिहासिक क्षणी वैयक्तिकरित्या येथे उपस्थित राहणं, हे मी माझं भाग्य समजतो. आता टीएमसी सरकारचा कार्यकाळ अधिकृतपणे संपला आहे आणि विधानसभेच्या विसर्जनामुळं त्यांचे (ममता बॅनर्जी यांचे) मुख्यमंत्रीपद आपोआप संपुष्टात आले आहे. त्यामुळं त्यांचा राजीनामा देण्यास नकार देणं निरर्थक आहे.

## हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे विशेष टपाल तिकीट जारी होणार



**मुंबई/प्रतिनिधी :** हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विशेष टपाल तिकीट जारी करून भारतीय टपाल विभागाकडून अनोखी आदरांजली दिली जाणार आहे. यासंदर्भात, शिवसेना सरचिटणीस, माजी खासदार राहुल शेवाळे यांनी केलेल्या मागणीची दखल भारतीय टपाल विभागाने घेतली असून, लवकरच यावर सकारात्मक निर्णय घेतला जाणार आहे. या मागणीबाबत केंद्र सरकारकडून नुकतेच एक पत्र प्राप्त झाल्याची माहिती शेवाळे यांच्याकडून देण्यात आली.भारतीय टपाल विभागातील उप महासंचालक कार्यालयाकडून शेवाळे यांना प्राप्त झालेल्या पत्रात लिहिले आहे की, फिलाटेल (संग्रह) विभागाच्या सल्लागार समितीच्या आगामी बैठकीत, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विशेष टपाल तिकीट जारी करण्याबाबत चर्चा करण्यात येईल. त्यामुळे लवकरच अशा प्रकारचे तिकीट जारी केले जाण्याची शक्यता आहे. जानेवारी महिन्यात, केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांना दिलेल्या लेखी निवेदनात शेवाळे यांनी म्हटले होते की, २७ जानेवारी रोजी वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची १०० वी जयंती देशभरात मोठ्या आनंदाने साजरी करण्यात आली. जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने वंदनीय बाळासाहेबांना अनोखी श्रद्धांजली द्यावी, ही देशभरातील लाखो चाहत्यांची इच्छा प्रत्यक्षात आणण्यासाठी केंद्र सरकारने विशेष टपाल तिकीट जारी करून यथोचित सन्मान करावा.

जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने विशेष टपाल तिकीट जारी करून वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना अनोखी आदरांजली द्यावी, अशी मागणी केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्याकडे केली होती. या मागणीची दखल घेऊन, फिलाटेल समितीच्या आगामी बैठकीत सकारात्मक चर्चा केली जाईल, अशा आशयाचे पत्र टपाल विभागाकडून मला प्राप्त झाले आहे. त्यामुळे लवकरच भारतीय टपाल विभागाकडून अशा प्रकारचे विशेष टपाल तिकीट जारी केले जाईल आणि माझ्यासारख्या लाखो शिवसैनिकांची मागणी पूर्णत्वास येईल, याची मला खात्री आहे.

## पोटच्या मुलीचा लाकडे कापायच्या कटरने पित्याकडून खून

**दौंड/प्रतिनिधी :** नसरापूरे येथील घटनेने संपूर्ण राज्य हादरून गेलेले असतानाच दौंड तालुक्यातील देऊळगाव राजे येथे धक्कादायक घटना घडली आहे. बापानेच पोटच्या ९ वर्षीय मुलीची हत्या केलीय. लाकडे कापण्याच्या इलेक्ट्रिक कटरनं गळ्यावर आणि डोक्यावर फिरवून हत्या केली. एवढ्यावरच तो नराधम बाप थांबला नाही , तर त्याने या हत्येचा पुरावा नष्ट करण्याचाही प्रयत्न केला. खून केलेल्या ९ वर्षाच्या स्वत:च्या मुलीला साडीत गुंडाळून घर पेटवून दिले.

शांताराम चव्हाण हा देऊळगाव राजे या गावातील हनुमान वस्ती येथे त्याच्या कुटुंबासह राहत होता. नुकतंच काही दिवसांपूर्वी शांताराम चव्हाण यांचा मुलगा संस्कार आणि मुलगी अनामिका या दोघांचेही परीक्षेचे निकाल लागले होते. संस्कार हा चौथी इयत्तेत तर मुलगी अनामिका ही तिसऱ्या इयत्तामध्ये शिकत होती. मात्र, निकालावरून अनामिकाला घरामध्ये चिडवले गेले होते. यावरून अनामिका हिने संस्कारच्या शाळेच्या गुणपत्रिकेवर खाडाखोड केली होती. याचा राग मनात धरून शांताराम चव्हाणने मुलगी अनामिका हिच्या गळ्यावर डोक्यावर आणि पाठीमागे बाजूस लाकडे कापण्याचा कटर फिरवून तिची हत्या केली. हे हत्येबाबतचे प्राथमिक कारण सध्या पोलिसांकडून सांगितले जात आहे. मात्र, प्रत्यक्षात कोणत्या कारणामुळे शांतारामने पोटच्या मुलीची हत्या केली? याचा तपास दौंड पोलिसांकडून केला जात आहे.

शांताराम चव्हाणची पत्नी ही आता त्याच्यासोबत राहत नसून ती तिच्या माहेरी आहे. शांताराम याच्यासोबत पटत नसल्यानं ती आई-वडिलांसोबत बारामती येथे राहत आहे. शांतारामसोबत आता दुसरी महिला राहत आहे. हत्येची धक्कादायक घटना घडल्यानंतर शांताराम चव्हाणनं पुरावा नष्ट करण्यासाठी अनामिका हिचा मृतदेह एका साडीमध्ये गुंडाळला. तो मृतदेह घरात ठेवून घर पेटवून दिले.

## इंडियन ऑइलच्या सीएसआर उपक्रमातून सर जे. जे. रुग्णालयाला मिळणार अत्याधुनिक ब्रॉन्कोस्कोप प्रणाली : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### मुख्यमंत्री यांच्या पुढाकारातून श्वसनविकारांच्या निदानाला मिळणार गती

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवांना अधिक सक्षम आणि आधुनिक करण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड च्या सीएसआर उपक्रमांतर्गत मुंबईतील सर जे.जे. हॉस्पीटी येथे अत्याधुनिक हाय-डेफिनिशन व्हिडिओ ब्रॉन्कोस्कोप प्रणाली उपलब्ध करून देण्यात आली आहे.




सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार उपचार उपलब्ध करून देण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सर जे. जे. रुग्णालयातील फुफ्फुसविकार विभागामध्ये दरमहा सुमारे ७० ते ८० ब्रॉन्कोस्कोपी प्रक्रिया केल्या जातात. क्षयरोग, विशेषतः औषध-प्रतिरोधक क्षयरोग, फुफ्फुसाचा कर्करोग, इंटरस्टिशियल लंग डिसीज आणि श्वसनमार्गातील अडथळे यांसारख्या गंभीर आजारांचे लवकर निदान करण्यासाठी ब्रॉन्कोस्कोपी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. मात्र, जुन्या आणि कालबाह्य उपकरणांमुळे वेळेवर आणि अचूक निदान करण्यात अडचणी येत होत्या. याच पार्श्वभूमीवर इंडियन ऑइलने सीएसआरच्या माध्यमातून हाय-डेफिनिशन व्हिडिओ ब्रॉन्कोस्कोप प्रणाली उपलब्ध करून दिली असून त्यामुळे रुग्णालयाच्या निदान क्षमतेत मोठी वाढ होणार आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे श्वसनविकारांचे अचूक आणि जलद निदान शक्य होईल, तसेच गंभीर रुग्णांवर वेळेत उपचार सुरू करण्यास मदत मिळणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमाचे स्वागत करताना सांगितले की, राज्य शासनाच्या आरोग्य क्षेत्रातील सुधारणांना विविध उद्योगसमूह आणि सार्वजनिक उपक्रमांचे सहकार्य लाभत आहे. इंडियन ऑइलच्या या उपक्रमामुळे गरीब आणि गरजू रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा सरकारी रुग्णालयातच उपलब्ध होतील. लवकर निदान आणि वेळेत उपचार यामुळे अनेकांचे प्राण वाचविण्यास मदत होईल.

या नव्या प्रणालीमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्णांना खासगी रुग्णालयांमध्ये महागड्या तपासण्यांसाठी जाण्याची गरज कमी होणार असून सरकारी आरोग्य व्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होणार आहे. श्वसनविकारांच्या उपचारामध्ये ही सुविधा महत्त्वाची ठरणार असून सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात आधुनिक वैद्यकीय उपकरणांच्या उपलब्धतेसाठी सीएसआर भागीदारीचे हे एक प्रभावी उदाहरण मानले जात आहे.

## ‘मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने’अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवासाची संधी, १५ मे पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सुरू करण्यात आलेल्या ‘‘मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना’’ अंतर्गत पात्र ज्येष्ठ नागरिकांसाठी बिहार राज्यातील बोधगया येथे तीर्थदर्शन यात्रा आयोजित करण्यात येत आहे. या यात्रेसाठी इच्छुक व पात्र ज्येष्ठ नागरिकांकडून अर्ज मागविण्यात आले असून दि. १५ मे २०२६ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन मुंबई उपनगर सहाय्यक आयुक्त रविकिरण पाटील यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक असून त्यांचे वय ६० वर्षे किंवा त्यावरील असावे. अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये २.५० लाखांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णयातील इतर अटी व शर्ती लागू राहणार असून लाभार्थी प्रवासासाठी शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे.

या यात्रेसाठी प्रवास, निवास व भोजनाची सुविधा शासन नियमानुसार उपलब्ध करून देण्यात येणार आहे. निवड झालेल्या लाभार्थ्यांनाच यात्रेत सहभागी होता येईल. ७५ वर्षांवरील अर्जदारांना त्यांच्या जीवनसाथी किंवा सहाय्यकापैकी एका व्यक्तीस सोबत नेण्याची परवानगी देण्यात येणार आहे. अपूर्ण अथवा अपात्र अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत तसेच अर्जामध्ये खोटी माहिती आढळल्यास अर्ज रद्द करण्यात येईल.

मुंबई उपनगर जिल्ह्यातील पात्र व इच्छुक ज्येष्ठ नागरिकांनी विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्ज सादर करावेत तसेच अधिक माहितीसाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई उपनगर यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

## आधुनिक तंत्रज्ञानामुळे शासकीय सेवा अधिक गतिमान

**मुंबई/प्रतिनिधी :** कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल प्रणाली आणि आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरामुळे शासकीय सेवा अधिक वेगवान, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख होत असल्याचे मत सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने आयोजित ’टेक-वारी २.०’ मधील तांत्रिक प्रशिक्षण सत्रात तज्ज्ञांनी व्यक्त केले.

मंत्रालयातील परिषद सभागृहात आयोजित या प्रशिक्षण सत्रात डेटा व्यवस्थापन, माहिती केंद्रे, जीपीयू आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्रणालींच्या वापराबाबत प्रायमस पार्टनर्सचे अभिजित धर, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (एनआयसी), महाराष्ट्राच्या राज्य सूचना अधिकारी सपना कपूर तसेच गुगलचे वरिष्ठ तांत्रिक विशेषज्ञ प्रवीण दवे यांनी मार्गदर्शन केले. सत्राच्या प्रारंभी अभिजित धर यांनी माहिती केंद्रांची मूलभूत रचना, प्रक्रिया प्रणाली, माहिती साठवण व्यवस्था, नेटवर्क प्रणाली आणि आभासी प्रणाली याबाबत मार्गदर्शन केले. शासनाच्या विविध डिजिटल सेवा माहिती केंद्रांमधून कशा कार्यरत असतात, तसेच क्लाउड तंत्रज्ञान, माहिती सुरक्षा आणि पर्यायी माहिती केंद्र व्यवस्थेचे महत्व त्यांनी स्पष्ट केले.

सपना कपूर यांनी शासनाच्या डिजिटल प्रणालींबाबत माहिती देताना विविध विभागांमधील माहिती एकत्रितपणे जोडण्याचे महत्त्व अधोरेखित केले. नागरिकांना अधिक जलद आणि सुरक्षित सेवा देण्यासाठी डिजिटल पायाभूत सुविधा मजबूत करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रवीण दवे यांनी जीपीयू, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक माहिती केंद्रांची कार्यपद्धती याविषयी मार्गदर्शन करताना मोठ्या प्रमाणावर येणाऱ्या सीसीटीव्ही चित्रफितींचे तत्काळ विषण, वाहतूक नियमभंग ओळखणे तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सतर्कता प्रणालींचा वापर याबाबत सोदाहरण माहिती दिली. केंद्रीय प्रक्रिया युनिट आणि जीपीयू यांतील फरक तसेच समांतर प्रक्रिया प्रणालीचे महत्व त्यांनी स्पष्ट केले.

# लातूर शहरात महाराजस्व अभियान उत्साहात

## विविध शासकीय योजनांचा २ हजार नागरिकांच्या घेतला लाभ

**लातूर :** महाराष्ट्र शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत लातूर शहरासाठी गिरवलकर मंगल कार्यालय येथे समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला लातूरच्या महापौर जयश्री सोनकांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे, प्रभारी गटविकास अधिकारी सतीश चोरमले, नगरसेवक सतीश साळुंके आणि फिरदोस अरीफ शेख-साकोळकर यांच्यासह विविध विभागांचे तालुकास्तरीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबिरामध्ये एकूण १२ विभागांचे स्टॉल्स उभारण्यात आले होते, ज्याद्वारे नागरिकांना विविध शासकीय सेवा आणि योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली. यामध्ये संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत प्रलंबित बँक केवायसी पूर्ण करण्यासोबतच नवीन अर्जांसाठी मार्गदर्शन करण्यात आले, तर पुरवठा विभागामार्फत डिजिटल रेशन कार्डचे वाटप आणि दुरुस्तीबाबत माहिती देण्यात आली. महसूल विभागाने नागरिकांना जिवंत व डिजिटल सातबाराचे विनामूल्य वाटप केले, तसेच रहिवासी, उत्पन्न आणि जातीच्या प्रमाणपत्रांचे नवीन अर्ज स्वीकारले. भूमी अभिलेख विभागामार्फत लातूर मंडळातील ७ गावांचे नकाशे संबंधित ग्रामपंचायतींना सुपूर्द करण्यात आले असून पी.आर. कार्ड आणि मोजणीबाबत माहिती देण्यात आली.

कृषी विभागाने पी.एम. किसान, महाडीबीटी आणि महाविस्तार- ॲप यांसारख्या आधुनिक योजनांची माहिती दिली, तर आरोग्य विभागाने आयोजित केलेल्या विशेष कॅम्पमध्ये रक्ताची व रक्तदाब तपासणी करण्यासोबतच आयुष्मान भारत आणि महात्मा फुले जन आरोग्य योजनेविषयी माहिती देण्यात आली. महावितरण विभागाने मागेल त्याला सोलर आणि प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेसाठी नागरिकांकडून अर्ज भरून घेतले.




महिला व बाल विकास विभागामार्फत लेक लाडकी योजना, प्रधानमंत्री मातृवंदना योजना आणि बेबी केअर किटबाबत मार्गदर्शन करून गरोदर मातांना आहार योजनेची माहिती देण्यात आली. याशिवाय घरकुल योजना आणि वन विभागाच्या योजनांचे स्टॉल्सही नागरिकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरले. एकूण १६५ लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले, शहरातील सुमारे २ हजार नागरिकांनी या अभियानात सहभाग नोंदवला. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवासी नायब तहसीलदार गणेश सरोदे यांनी केले.

संपादकीय...

## भारत-ऑस्ट्रियामध्ये विविध करारांवर स्वाक्षऱ्या

भारतीय जनता पक्षाचे पश्चिम बंगाल आणि आसाममधील विजय हे केवळ त्यांच्या निवडणूक आकड्यांमध्ये झालेली आणखी एक भर नसून, राजकारण कसे लढले जाते आणि जिंकले जाते यातील एका मोठ्या बदलाचे ते द्योतक होय. गोव्यात पश्चिम बंगाल आणि आसाममधील विजयाचा आनंदोत्सव साजरा करतानाच जल्लोषाचे वातावरण निर्माण केले. गोव्यात २०२७ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी हे निकाल मार्गदर्शक आहेत तसेच एक इशाराही देतात. ज्या राज्यात ऐतिहासिकदृष्ट्या प्रादेशिक अस्मितेने राजकीय निष्ठेला आकार दिला आहे, तिथे भाजपने ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसच्या दीर्घकाळ प्रस्थापित राजवटीला अत्यंत कुशलतेने पदच्युत केले. दरम्यान, आसामने ईशान्य भारतावरील भाजपची वाढती पकड पुन्हा एकदा सिद्ध केली, जो प्रदेश एकेकाळी राष्ट्रीय राजकीय गणितांच्या परिघावर होता. अनेक दशकांपासून, पश्चिम बंगालसारखी राज्ये राष्ट्रीय पक्षांसाठी अभेद्य मानली जात होती. या निवडणुकीने असा मतदारवर्ग दाखवला आहे, जो कल्याणकारी योजना, सुशासन आणि अस्मिता यांभोवती रचलेल्या राष्ट्रीय विचारप्रणालींकडे आकर्षित झाला आहे. भाजपने पारंपरिक आसामी राष्ट्रवाद आणि हिंदुत्व यांच्यात यशस्वीपणे समन्वय साधला आहे, ज्यामुळे हिंदू मतांचे मजबूत एकत्रीकरण झाले आहे. तसेच, टीएमसीकडून होणाऱ्या कथित अल्पसंख्याक तुष्टीकरणाविरुद्ध बंगाली हिंदूंचे एकमेव संरक्षक असल्याची प्रतिमाही त्यांनी यशस्वीपणे तयार केली. उत्तर बंगाल आणि सीमावर्ती जिल्ह्यांसारख्या प्रदेशांमधील वाढलेले मतदान आणि ध्रुवीकरण भाजपच्या फायद्याचे ठरले. भाजपच्या पारंपरिक बालेकिल्ल्यांव्यतिरिक्त इतर प्रदेशांमध्ये प्रवेश करणे हा संघ परिवाराचा दीर्घकालीन प्रयत्न राहिला आणि या प्रयत्नात ते यशस्वी झाले. तामिळनाडूमध्येही त्यांना चांगले यश मिळाले आहे. गोव्याच्या राजकारणाची स्वतःची एक लय नेहमीच राहिली आहे, कारण ते मोठ्या प्रमाणावर पक्षीय राजकारणापेक्षा व्यक्तिपूजक राहिले आहे. परंतु आता हे अभेद्र्य कवच पातळ होत आहे आणि नवीन चेहरे आपली उपस्थिती दर्शवत आहेत. गोव्यासारख्या ठिकाणी, जिथे लोकसंख्याशास्त्रीय घटक निर्णायकपणे निकालांवर परिणाम करू शकतात, तिथे अशा प्रकारचे एकत्रीकरण होण्याची शक्यता कमी आहे, परंतु तसे झाल्यास, पारडे मोठ्या प्रमाणात झुकू शकते. तज्ञांच्या मते, राज्यात सध्या दिसणारी जातीय संघर्ष ही त्या दिशेने उचललेले एक सुनियोजित पाऊल आहे. त्यातून मतांचे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न होणार आहे. भाजपच्या विकास आणि नागरिक कल्याणाच्या संदेशामुळे विरोधी पक्षांना त्याला आव्हान देण्यासाठी अनेकदा फारच कमी वाव मिळाला आहे. गोव्यात याचा अर्थ असा होईल की, पक्षांनी भाजपवर टीका करण्यापलीकडे जाऊन एक स्पष्ट आणि विश्वासार्ह पर्याय सादर करावा लागेल. सध्या आत्मविश्वासाने भारलेल्या भाजपच्या सुसंघटित यंत्रणेसमोर, विरोधी पक्ष जर विस्कळीत राहिला, तर इतर राज्यांप्रमाणेच गोव्यातही त्यांचा पूर्णपणे सफाया होऊ शकतो. सर्वात दुर्दैवी बाब ही आहे की, गोव्यातील राजकारणी भूतकाळातील अपयशातून धडा शिकायला तयार नाहीत. आजही गोव्यात विरोधी पक्ष मजबूत दिसून येत नाही. पश्चिम बंगाल आणि आसाममधील भाजपची कामगिरी ही केवळ एक तात्पुरती लाट नसून, संपूर्ण भारतात निवडणुका कशा नव्याने आकार घेत आहेत याचेच ते अधिक द्योतक आहे. गोव्यासाठी संदेश स्पष्ट आहे की, विरोधी पक्षांनी एक भक्कम संघटनात्मक जाळे, कथानकातील स्पष्टता आणि स्थानिक संवेदनशील मुद्द्यावर पूर्ण भर देण्याची गरज आहे. विरोधक एकत्रितपणे २०२७ मध्ये निवडणुकीला सामोरे गेले तरच गोव्यात निर्णायक बदल होऊ शकतो. आजच्या घडीला गोव्यात विरोधक एकत्र नाही. मात्र, त्यांच्याकडे एकत्र येण्यासाठी अजून थोडा वेळ हातात आहे. आपसातील मतभेद व रुसवे फुगवे बाजूला ठेऊन एकत्र आले तरच भाजपला रोखता येईल, अन्यथा गोव्यातील निकाल हा भाजपच्याच बाजूने असेल हे सांगण्यासाठी कुणा ज्योतिषाची गरज भासणार नाही.

# 'टेक-वारी २.०' मुळे महाराष्ट्राच्या प्रशासनाला नवी दिशा - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई/प्रतिनिधी :** विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्राचा संकल्प साकार करण्यासाठी प्रशासनात नाविन्यपूर्ण उपक्रमांची आवश्यकता असून, 'टेक-वारी २.०'च्या माध्यमातून राज्य प्रशासनाला नवी दिशा देण्याचे कार्य सुरू आहे, असे प्रतिपादन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगण येथे आयोजित 'टेक-वारी २.० महाराष्ट्र प्रशिक्षण सप्ताह' अंतर्गत महासाधना सप्ताहातील विशेष पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, सामान्य प्रशासन विभाग सेवा मुख्य अतिरिक्त सचिव व्ही. राधा तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, सामान्य प्रशासन विभागाने 'टेक वारी २.०'च्या माध्यमातून राज्याच्या प्रशासनाला नवी दिशा देण्याचे कार्य केले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने नागरिकांपर्यंत सेवा अधिक प्रभावीपणे पोहोचविण्याचा हा प्रयत्न असून, विविध विभागांमध्ये तंत्रज्ञानाधिष्ठित कार्यपद्धती विकसित करणे ही काळाची गरज आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकसित महाराष्ट्राचा संकल्प पूर्ण करण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी एकत्रितपणे कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

विकसित महाराष्ट्रासाठी तंत्रज्ञान, संस्कृती आणि प्रशासनाचा संगम आवश्यक सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार

सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी 'टेक वारी'ची तुलना पंढरपूरच्या वारीशी करताना सांगितले की, वारीमध्ये जशी शिस्त, सातत्य, अध्यात्म आणि सामूहिकता आहे, त्याचप्रमाणे प्रशासनात तंत्रज्ञान आत्मसात करण्याची वृत्ती विकसित होणे आवश्यक आहे. डिजिटल साक्षरता ही आजच्या काळातील खरी साक्षरता बनली असून, प्रशासनातील प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी यांनी नव्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेतले पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.



ते पुढे म्हणाले की, 'टेक वारी २.०' ही केवळ कार्यशाळा नसून प्रशासनाच्या भविष्यकालीन तयारीचा भाग आहे. 'विरासत से विकास तक' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार सांस्कृतिक वारसा जपत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विकास साधण्याचा हा प्रयत्न आहे. राज्यातील सुमारे पाच हजार कर्मचारी प्रत्यक्ष आणि नऊ लाखांहून अधिक कर्मचारी ऑनलाईन माध्यमातून या उपक्रमाशी जोडले गेले असून, हा देशातील सर्वांत मोठा तंत्रज्ञानाधारित प्रशिक्षण उपक्रम ठरल्याचे त्यांनी सांगितले.

टेक वारी' उपक्रमामुळे प्रशासन अधिक भविष्यवेधी-कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा

कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी 'टेक वारी' उपक्रमामुळे प्रशासन अधिक भविष्यवेधी बनत असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य प्रशासन जागतिक स्तरावरील स्पर्धेसाठी सज्ज होत असून, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी स्वतःला 'फ्युचर रेडी' बनविणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांनी प्रास्ताविकात चार मेपासून आयोजित विविध प्रशिक्षण उपक्रमांची माहिती दिली. डीपीडीपी, नवीन तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा आणि भविष्यातील महाराष्ट्राच्या विकासासाठी 'टेक वारी'चे महत्त्व याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

कर्मयोगी भारत २ एप्रिल ते १० एप्रिल २०२६ या सप्ताहात वैशिष्ट्यपूर्ण काम करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमास राज्यातील पुरस्कारप्राप्त अधिकारी-कर्मचारी तसेच मंत्रालयातील विविध विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जामिनावर बाहेर येताच पाचव्या दिवशी गेम! पुण्यात तरुणीवर हल्ला केलेल्या आरोपीला मध्यरात्रीचं संपवलं

**पिंपरी:** पिंपरी-चिंचवडमधील काळेवाडी परिसरात जुन्या वादातून एका तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या हल्ल्यात एक जण गंभीर जखमी झाला असून परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी या प्रकरणी एका आरोपीला रात्री अटक केली असून दुसरा आरोपी फरार होता त्यालाही आज अटक केली आहे. मृत तरुणाचे नाव हमीद शेख असे असून त्याचा मावसभाऊ अर्षद शेख हा गंभीर जखमी झाला आहे. रविवारी रात्री उशिरा ही घटना घडली. अनिकेत सूर्यवंशी आणि त्याचा भाऊ विशाल सूर्यवंशी यांनी धारदार शस्त्राने वार करत दोघांवर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात हमीद शेख याचा जागीच मृत्यू झाला, तर अर्षद याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच काळेवाडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला.

पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपी अनिकेत सूर्यवंशी याला ताब्यात घेतले असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसरा आरोपी विशाल सूर्यवंशी हा फरार होता त्याचा शोध घेऊन पोलिसांनी त्यालाही अटक केली आहे.

दरम्यान, प्राथमिक तपासात या हत्येमागे जुना वाद आणि एका तरुणीशी संबंधित प्रकरण असल्याची माहिती समोर आली आहे. हमीद शेख हा अवघ्या पाच दिवसांपूर्वीच जामिनावर तुरुंगातून बाहेर आला होता. चार महिन्यांपूर्वी त्याने एकतर्फी प्रेमातून एका तरुणीवर हल्ला केल्याचा आरोप होता. या प्रकरणात त्याच्यावर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता आणि तो तुरुंगात होता. हमीद जामिनावर सुटल्यानंतर तो पुन्हा संबंधित तरुणीला त्रास देईल, अशी भीती मुलीच्या कुटुंबीयांना होती. संबंधित तरुणीचे कुटुंबीय आणि आरोपी सूर्यवंशी बंधू हे एकमेकांचे निकटवर्तीय असल्याची माहिती समोर आली आहे. तरुणीच्या आईने हमीद बाहेर आल्याबाबत चिंता व्यक्त करत आरोपींकडे भीती बोलून दाखवली होती. त्यानंतरच हा हल्ला झाल्याने पोलिस या सर्व घडामोडींचा तपास करत आहेत.या घटनेमुळे काळेवाडी परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

हल्ला झालेला हमीद शेख पाच दिवसांपूर्वी तुरुंगातून जामिनावर बाहेर आला. चार महिन्यांपूर्वी एक तरुणीवर एकतर्फी प्रेमातून त्याने हल्ला केला होता. याचं प्रकरणात हत्येचा प्रयत्न केला म्हणून तो तुरुंगात होता. ही शिक्षा भोगत असताना जामिनावर तो बाहेर आला. हमीद बाहेर आल्यानं तो पुन्हा मुलीला त्रास देईल, अशी भीती मुलीच्या कुटुंबीयांनी होती. याचं भीतीतून ही धक्कादायक घटना घडली. तरुणीचे कुटुंबीय हे आरोपींचे निकटवर्तीय आहेत. तरुणीच्या आईने आरोपींना हमीद जामिनावर बाहेर आलाय. आता तो पुन्हा मुलीला त्रास देईल, अशी चिंता आरोपींकडे व्यक्त केली होती. या दृष्टीने ही तपासाची चक्र फिरू लागलेली आहेत.

## निदा खानच्या आजच्या पहिल्या सुनावणीत न्यायालयात घडले ?

नाशिक : टीसीएस प्रकरणातील आरोपी निदा खान हिला अखेर छत्रपती संभाजी नगरमधून अटक करण्यात आली. गेले २५ दिवस निदा खान पोलिसांना गुंगारा देऊन लपली होती. कोर्टाने तिचा जामीन नाकारल्यानंतर अखेर पोलिसांनी तिला शोधून काढले. तिच्यासोबत पाच जणांनाही अटक करण्यात आली आहे. आज कोर्टात आज करण्यात आले. दरम्यान ऊणए प्रकरणातील आरोपी निदा खानला ११ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.



टीसीएस (ऊणए) प्रकरण उघड झाल्यानंतर निदा खानने नाशिक न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता, परंतु न्यायालयाने तिचा अर्ज फेटाळला होता. गर्भवती असल्याचं कारण देत तिने पुन्हा एकदा जमिनासाठी प्रयत्न केला होता, मात्र तिला अटकपूर्व जामीन मंजूर झाला नाही. अखेर मोठ्या प्रयत्नानंतर तिला आता पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

या प्रकरणातील चार आरोपी रजा रफीक मेमन, तौसीफ बिलाल अत्तार, दानिश शेख आणि शाहरुख हुसैन शौकत कुरेशी यांना पोलिसांनी आधीच अटक केली होती. हे सर्व आरोपी सध्या तुरुंगात आहेत. परंतु या प्रकरणाची मास्टरमाईंड असलेली निदा खान मात्र फरार झाली होती. ती अनेक दिवस पोलिसांना गुंगारा देत होती. अखेर तिला आता छत्रपती संभाजीनगरमधून अटक करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर पोलीस आणि नाशिक गुन्हे शाखेच्या पोलिसांकडून ही संयुक्त कारवाई करण्यात आली आहे.

# प्रवासात माणसं जास्त कळत जातात!

माणसाला ओळखायचं असेल, तर त्याच्याशी फार काळ बोलण्याची गरज नसते; त्याच्यासोबत थोडासा प्रवास केला तरी पुरेसं ठरतं. कारण प्रवास हा केवळ अंतर कापण्याचा प्रकार नसतो, तो माणसाच्या स्वभावाचा, संवेदनांचा आणि वास्तवाशी असलेल्या नात्याचा आरसा असतो. घरात, कार्यालयात किंवा समाजात माणूस अनेक भूमिका वठवत असतो; पण प्रवासात त्या भूमिका हळूहळू गळून पडतात आणि उरतो तो केवळ माणूस अस्सल, निखळ, मुखवट्यांशिवाय. घराच्या चार भिंतींमध्ये माणूस सुरक्षित असतो. ओळखीची माणसं, ओळखीची परिस्थिती, ठरलेली चौकट या सगळ्यात तो स्वतःला लपवू शकतो. पण प्रवासात चौकट मोडते. वेळेचं बंधन असतं, अनिश्चितता असते, कधी गर्दी, कधी थकवा, कधी उशीर, तर कधी अचानक येणारा अडथळा. या सगळ्या क्षणांत माणसाचं खरं रूप समोर येतं. कुणाचा संयम सुटतो, कुणी शांत राहतो; कुणी दुसऱ्याला मदत करतो, तर कुणी स्वतःपुरताच विचार करतो.

रेल्वेचा डबा, एसटीची बस, विमानतळावरची वाट पाहणारी गर्दी, रस्त्याच्या कडेला उभं असलेलं ढाबा ही सगळी ठिकाणं माणसांच्या स्वभावाची प्रयोगशाळा असतात. एका लांब पल्ल्याच्या प्रवासात सहप्रवासी फक्त प्रवासी राहत नाहीत; ते समाजाचे प्रतिनिधी बनतात. श्रीमंत-गरीब, शिकलेले-अशिक्षित, शहर-गाव, स्त्री-पुरुष, वृद्ध-तरुण सगळे एकाच प्रवासात भेटतात. आणि इथेच कळतं की माणुसकी ही पद, पैसा किंवा प्रतिष्ठेवर अवलंबून नसते. प्रवासात माणूस वेळेच्या तणावाखाली असतो. ट्रेन सुटेल का? बस मिळेल का? फ्लाइट वेळेवर आहे का? या प्रश्नांच्या गर्दीत त्याचा स्वभाव उघडा पडतो. कुणी रागावतो,



कुणी शिव्याशाप देतो, तर कुणी शांतपणे पर्याय शोधतो. एखादी स्त्री लहान मुलाला सांभाळत असताना मदतीचा हात पुढे करणारा अनोळखी पुरुष किंवा गर्दीत स्वतःची सीट वृद्धाला देणारा तरुण हे क्षण फार मोठे वाटत नाहीत, पण ते माणसाचं मोठेपण सांगून जातात.

आजच्या काळात माणूस बोलतो खूप, पण ऐकतो फार कमी. प्रवासात मात्र शब्द कमी आणि निरीक्षण जास्त असतं. समोरचा काय बोलतो यापेक्षा तो कसा वागतो, यावरून त्याचं व्यक्तिमत्त्व समजतं. गर्दीत कुणी ढकलतं, कुणी वाट देतं; कुणी नियम तोडतो, तर कुणी नियम पाळण्यासाठी त्रास सहन करतो. प्रवास म्हणजे सभ्यतेचीही कसोटी असते. ग्रामीण भागातून शहराकडे जाणारा प्रवासी वेगळा असतो आणि शहरातून गावाकडे जाणारा वेगळा. पहिल्याच्या डोळ्यांत आशा असते, स्वप्नं असतात, तर दुसऱ्याच्या मनात आठवणी असतात, मातीचा ओलावा असतो. कुणी नोकरीच्या शोधात आहे, कुणी आजारपणामुळे प्रवास करतोय, कुणी लग्नासाठी, तर कुणी अंत्यसंस्कारासाठी. एकाच डब्यात बसलेली माणसं वेगवेगळ्या कहाण्या घेऊन चाललेली असतात. त्या कहाण्या न बोलताही त्यांच्या चेहऱ्यावर उमटत असतात.

प्रवासात माणूस कधी कधी खूप प्रामाणिक होतो. कारण इथे ओळखीचा दबाव नसतो. सहप्रवासी पुन्हा भेटणार नाही, ही जाणीव त्याला मोकळं करते. म्हणूनच कधी कधी एखादा प्रवासी आपली दुःखं अनोळखी माणसासमोर मोकळेपणाने सांगतो. त्या काही तासांच्या सहवासात निर्माण झालेली आपुलकी खरी असते, कारण ती कोणत्याही स्वार्थावर आधारलेली नसते. प्रवासात माणसाचं नातं वेळेशीही बदलतं. घाई असताना तो चिडचिडा होतो, तर वेळ भरपूर असताना शांत. उशीर झाला की माणसाचा खरा संयम कळतो. उशीर हा केवळ वेळेचा नसतो; तो आयुष्यातील अपयशांचा, प्रतीक्षेचा, संघर्षांचा प्रतीक असतो. प्रवासात उशीर सहन करणारा माणूस आयुष्यातही बरंच काही सहन करत असतो.

आजच्या डिजिटल युगातही प्रवास माणसाला एकटं पाडतो. मोबाईल हातात असूनही मनात एक रिकामेपण असतं. खिडकीबाहेर धावणारी झाडं, बदलणारी गावं, मागे पडणारी शहरं हे सगळं पाहताना माणूस स्वतःकडे वळतो. त्या क्षणी त्याला स्वतःबद्दलही काही कळतं. आपल्याला नेमकं काय हवंय? आपण कुठे चाललोय? आणि या प्रवासात कुणाला दुखावलंय का? हे प्रश्न मनात उमटतात. प्रवासात माणसं जास्त कळतात, कारण इथे दिखावा टिकत नाही. थकवा खरा असतो, भूक खरी असते, रागही खरा असतो आणि करुणाही खरी असते. प्रवासात माणूस जितका बाहेरचा प्रवास करतो, तितकाच आतलाही करतो. म्हणूनच प्रवास संपल्यानंतर आपण केवळ एका ठिकाणी पोहोचत नाही, तर थोडे अधिक समजूतदार, थोडे अधिक प्रगल्भ होऊन परततो.

आज समाजात वाढत चाललेली असहिष्णुता, चिडचिड, आत्मकेंद्रीपणा पाहता प्रवासाचं महत्त्व अधिक वाढलं आहे. प्रवास माणसाला थांबायला शिकवतो, वाट पाहायला शिकवतो, आणि दुसऱ्याच्या जागी स्वतःला ठेवून पाहायला शिकवतो. तो माणसाला सांगतो की आपण सगळेच या जगात प्रवासी आहोत. कुणी थोडा पुढे, कुणी थोडा मागे; पण वाट सगळ्यांची एकच आहे. म्हणूनच म्हणावंसं वाटतं, माणसं ओळखायची असतील, तर त्यांच्याशी वाद घालू नका, चर्चा करू नका; त्यांच्यासोबत थोडासा प्रवास करा. कारण प्रवासात माणसं जास्त कळत जातात आणि कधी कधी आपणही स्वतःला नव्यानं ओळखू लागतो.

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**मो. ९२३६२०९१९**

# केज शहरातील टेम्पो चोरीच्या गुन्ह्यातील २ सराईत आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने ठोकल्या बेड्या

## आयशर टेम्पो चोरीचा गुन्हा एका दिवसात उघडकीस आणण्यास स्थानिक गुन्हे शाखेला आले यश

**केज/प्रतिनिधी :** केज शहरातील एका आयशर टेम्पो चोरीचा गुन्हा एका दिवसात उघडकीस आणण्यास स्थानिक गुन्हे शाखेला यश आले असून सदरिल चोरीच्या गुन्ह्यातील २ सराईत आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या आहेत.

केज शहरामध्ये गेल्या अनेक वर्षापासून सातत्याने दोन चाकी व चारचाकी वाहने चोरीला जाण्याचे प्रमाण वाढले आहे. स्थानिक गुन्हे शाखेने सध्या सराईत गुन्हेगाराची शोध मोहीम चालू केली आहे. या मोहिमेमुळे चोरीचे प्रमाण कमी होऊन नागरिकांना दिलासा मिळत आहे. त्यामुळे स्थानिक गुन्हे शाखेच्या कामगिरीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, नसीर कुरेशी रा. रोजा मोहल्ला केज यांनी केज पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली होती की, दिनांक ५ मे २०२६ रोजी त्यांच्या मालकीचा आयशर टेम्पो क्र.एम.एच.-१५ डि.के.-४२४१ हा त्यांच्या घराच्या पाठीमागील बाजूस असलेल्या मोकळ्या जागेत रात्रीच्या वेळी लावलेला होता.

दिनांक ६ मे २०२६ रोजी सकाळी सदर आयशर टेम्पो हा किरायाने घेऊन जाण्यासाठी घराच्या पाठीमागील मोकळ्या जागेत गेले असता नशीर कुरेशी यांना सदर टेम्पो दिसून आला नाही. अशा वर्णनाच्या फिर्यादीवरून केज पोलीस ठाणे येथे गुर.नं.२६६/२०२६ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर टेम्पोचा शोध घेऊन आरोपी अटक करण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांच्या पथकाला आदेशित करून केज येथे रवाना केले.

सदर घटनास्थळास पथकाने भेट दिली व सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. दोन इसम सदर टेम्पो चोरी करत असताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दिसून आले. सदरच्या दोन्ही इसमा बाबत माहिती घेतली असता सीसीटीव्ही फुटेज मधील इसम हे उमरे उर्फ पाप्या मुस्ताक फारोकी रा. रोजा मोहल्ला केज, आवेष उर्फ आवड्या खॉजा शेख रा.कोकीजपीर केज हे असल्याचे समजले. यावरून दोन्हीही संशयतांना ताब्यात घेऊन सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याचे कबूल केला. सदर चोरी केलेला टेम्पो त्यांनी धारूर येथील एम.आय.डी.सी. परिसरात उभा केला असल्याचे सांगितले.

सदरचा टेम्पो त्यांच्याकडून जप्त करून दोन्हीही आरोपी त्यांना मुद्देमाला सह पुढील कार्यवाही कामी केज पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. वरील दोन्हीही नमूद आरोपी चोरी, जबरी चोरी करण्याच्या सवयीचे असून त्यांच्यावर गुन्हे नोंद आहेत. सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोह/बप्पासाहेब घोडके, पोह/जफर पठाण, पोह/महेश जोगदंड, पोह/दिलीप गीते, चापोह/गणेश मराडे यांनी केली आहे.



# केज येथे सत्यमेव जयते फार्मर कप आयोजित गटबांधणी कार्यशाळा



**केज/प्रतिनिधी :** केज येथे पाणी फाउंडेशन आयोजित सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धा उत्साहात सुरुवात झाली आहे. मागील काही दिवसांपूर्वी शेतकरी गटाचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. त्या सहभागी निमंत्रक शेतकऱ्यांसाठी केले ते शेतकरी गट बांधणी कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.

कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक तालुका कृषी अधिकारी सागर पठाडे, पर्यावरण मित्र डॉ. हनुमंत सौदागर, कृषी विभाग शरद घोबाळे, उमेदच्या तालुका अभियान व्यस्थापक नंदाताई ओव्हाळ, प्रभाग समन्वयक राजरत्न कसबे, आश्रूबा गोरे, सोनिया चौरे आदींची उपस्थिती होती.

तालुक्यातील शेतकरी घटना प्रेरित करून उत्पादन वाढीसाठी एकत्र येऊन गट बांधणी करणे आवश्यक आहे. कृषी विभाग कायम सोबत असल्याचे मत कृषी अधिकारी सागर पठाडे यांनी व्यक्त केले. फार्मर कपच्या माध्यमातून शेतकऱ्यांची समृद्धी होईल. शेतकऱ्यांच्या उन्नतीचा हा उत्तम मार्ग असल्याचे डॉ.हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले.

शेतकरी गटांना सदस्य निवड अथवा अन्य अडचणी आल्यास त्यांनी पाणी फाउंडेशन, कृषी विभाग, उमेद यांच्याशी समन्वय साधावा असे आवाहन यावेळी करण्यात आले. गट बांधणी झालेल्या तालुक्यातील विविध शेतकरी गटांचा सन्मान यावेळी करण्यात आला. तालुक्यात महिला शेतकरी गट मोठ्या संख्येने सक्रिय झाल्याचे कार्यशाळेत दिसून आले. यावर्षीचा फार्मर कप तालुक्यात यावा यासाठी सर्वांच्या वतीने प्रयत्न करावेत असे मत त्यावेळी व्यक्त केले.

कार्यशाळा यशस्वीतेसाठी तांत्रिक प्रशिक्षक विनोद ठोंबरे, तालुका समन्वयक सुवर्णा कांबळे आदींनी परिश्रम घेतले. कार्यशाळेस तालुक्यातील निमंत्रक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बौद्धजन सहकारी संघ गिमवी विभाग क्र. ३ यांच्या विद्यमाने १३५ व्या भीम महोत्सवाचे मुंढर गावी आयोजन



**गुहागर/प्रतिनिधी :** बौद्धजन सहकारी संघ गिमवी विभाग क्र. ३ तालुका गुहागर जिल्हा रत्नागिरी व शाखा क्र. २४, मौजे गाव मुंढर यांच्या संयुक्त विद्यमाने राजेश मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दि. १२ मे २०२६ रोजी भीम महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव रवी यशवंत जाधव व राजेश सिताराम मोहिते हे करतील, तर पाहुण्यांचे स्वागत दर्शन तुकाराम गमरे व विनोद गंगाराम मोहिते हे करतील, कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोज गमरे व सुनील पवार हे करणार असून सदर कार्यक्रमांतर्गत खेळ खेळूया पैठणीचा सन्मान करू वहिनींचा हा होम मिनिस्टर कार्यक्रम विशाल गमरे व राजेश मोहिते यांच्या सूत्रसंचलनात सानिका सचिन गमरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. सोबतच डॉ. सचिन ओक व डॉ. अश्रिवनी ओक, भूषण पवार, सागर सुर्वे, सुनील पवार यांच्या सहकार्याने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

संध्याकाळी सभेचे आयोजन करण्यात आले असून मान्यवरांचा सत्कार, विद्यार्थ्यांचा सत्कार आणि मरणोत्तर पुरस्कार यांचे वितरण करण्यात येईल, सायंकाळी ४:०० ते ६:०० भव्यदिव्य धम्मरॅली काढण्यात येईल तसेच शाखा अंतर्गत लकी ड्रॉचे अध्यक्ष अनिल जाधव यांच्या अध्यक्षतेखाली वितरण करण्यात येईल, रात्री ठीक १०:०० वाजता अरविंद मोहिते प्रस्तुत बहुजनांची प्रेरणा, धम्मपद वाद्यवृंद एक धम्मदेसना ऑर्केस्ट्रा संकल्पना दिग्दर्शन अरविंद मोहिते, निवेदिका अर्चना मोहिते यांचे आयोजन करण्यात आले आहे सदर कार्यक्रमास तालुकाध्यक्ष सुरेश सावंत, मुंबईचे चेअरमन दिपक मोहिते, चेअरमन मारुती मोहिते, दिलीप मोहिते, गावशाखा सचिव सुनील गमरे, दीपक मोहिते, संदेश जाधव, रुपाली गमरे, प्रमोदशेठ गांधी (सदस्य जिल्हापरिषद रत्नागिरी), मंगेश जोशी (सदस्य, पंचायत समिती गुहागर), परिक्षीत पाटील (तहसीलदार, गुहागर), परेश क्षीरसागर (गट विकास अधिकारी, गुहागर), प्रकाश शिर्के (तंटा मुक्ती, मुंढर), सचिन सावंत (पोलिस निरीक्षक, गुहागर), डॉ. प्रकाश शिर्के (सामाजिक कार्यकर्ते), सागर जाधव, प्रभाकर शिर्के (माजी सदस्य, पंचायत समिती, गुहागर) आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत तरी विभागातील सर्व शाखा त्यांचे पदाधिकारी, महिला मंडळ, उपासक उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन बौद्धजन सहकारी संघाच्या शाखा क्र. २४ मौजे मुंढर यांनी काढलेल्या परिपत्रकात निलेश गमरे यांनी म्हटले आहे.

# नाशिक रिंगरोड चा मार्ग मोकळा, उच्च न्यायालयाने कोणते निर्देश दिले ?

**नाशिक/प्रतिनिधी :** पुढील वर्षी नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, होणारा नाशिक रिंगरोड प्रकल्प दररोज वेगवेगळी वळणे घेत आहे. जमीन संपादनास विरोध, काही गावांमधून प्रतिसाद, कमी मोबदल्याची तक्रार, अधिकारी, पोलिसांकडून महिलांना मारहाम, असे वाद निर्माण झालेल्या या प्रकल्पाचा मार्ग अखेर एका न्यायालयीन निर्णयामुळे मोकळा झाला आहे.त्यामुळे प्रशासनाला मोठा दिलासा मिळाला असला तरी अजूनही या रिंगरोडला विरोध करणाऱ्या शेतकरी आणि जमीन मालकांची समस्या त्यांच्यासमोर आहे. यावर तोडगा निघत नाही, तोपर्यंत नाशिक रिंगरोडच्या कामाला प्रत्यक्षात कधी सुरुवात होईल, ते सांगणे अवघड झाले आहे. नाशिक रिंगरोड ज्या गावांमधून जाणार आहे, त्या मुंगसरा आणि मातोरी या दोन ठिकाणी दोन मे रोजी प्रकल्पास विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांच्या घरात शिरून पोलिसांनी महिलांसह पुरूषांना मारहाण केल्याची तक्रार करण्यात आली. प्रशासकीय अधिकाऱ्यांकडूनही मारहाण झाल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. संमतीने आणि थेट खरेदीने भूसंपादनासाठी शेतकऱ्यांना २५ टक्के वाढीव मोबदला दिला जाणार असल्याचे भूसंपादन अधिकाऱ्यांकडून सांगितले जात आहे. असे असले तरी मोबदल्याविषयी मुंगसरा आणि मातोरी परिसरातील जमीन मालकांमध्ये संभ्रम आहे.

ज्या अल्पभूधारकांची जमीन ताब्यात घेतली जाणार आहे, त्यांना कसा आणि किती मोबदला देणार, यासंदर्भात प्रशासनाकडून स्पष्टता करण्यात आलेली नसल्याचा ग्रामस्थांचा दावा आहे.

२ मे रोजी दरी, मातोरी, मुंगसरा परिसरात मोजणीचे काम बंदोबस्तात सुरू करण्यात आले.

# अनिल वैरागे, गौतम खंडागळे, सुनिता बोधने डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान अमृत महोत्सव गौरव पुरस्काराने सन्मानित



**केज/प्रतिनिधी :** केजचे भूमिपुत्र अनिल लिंबाजी वैरागे यांना संगीत क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान अमृत महोत्सव गौरव पुरस्कार २०२६ देऊन गौरविण्यात आले आहे. आशादीप महिला आधार मंच या सामाजिक संस्थेच्या व 'लेक लाडकी' अभियानाच्या संयुक्त विद्यमाने भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त तसेच महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

अनिल वैरागे यांनी संगीत क्षेत्रात केलेले निस्वार्थ कार्य, त्यांची सातत्यपूर्ण सेवा व कला जपण्याचा प्रयत्न करत आहे त्यांचे संगीत क्षेत्रातील उलखनीय कार्याची दखल घेऊन त्यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. हा पुरस्कार सोहळा दिनांक ३ मे २०२६ रोजी मुंबई येथील महर्षी दयानंद महाविद्यालय एमडी कॉलेज परळ (पूर्व) येथे आयोजित करण्यात आला.

या सोहळ्यास महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक व कवी नंदेश उमाप डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पंतु अक्षय आंबेडकर सिने अभिनेत्री डॉ.कॅरेन टेरी रजा तसेच महाराष्ट्र राज्याच्या महिला आयोगाच्या मा. अध्यक्ष निर्मला सामंत प्रभावळकर, आशादीप महिला आधार मंचाच्या अध्यक्षा आशाताई भोईर यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला त्याच बरोबर या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर आणि सेलिब्रिटी देखील उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून व संविधानाचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली.

हा पुरस्कार योग्य व्यक्तीला मिळाल्याने केज शहरासह रसिक श्रोते, मित्रपरिवार आणि विविध स्तरातून बीड जिल्ह्यातील अनिल वैरागे, गौतम खंडागळे, आम्रपाली साबळे, डॉ. रत्ना पनवेकर, सुनीता बोधने, व संतोष ससाने, यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## संक्षिप्त...

### मोंढा बाजारात पत्रकाराचा ४१ हजारांचा व्हिवो मोबाईल चोरीला

**अंबाजोगाई/प्रतिनिधी :** अंबाजोगाई शहरातील मोंढा बाजार परिसरातून स्थानिक पत्रकार प्रशांत रघुनाथ मस्के यांचा ४१ हजार किमतीचा व्हिवो कंपनीचा मोबाईल चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. ही घटना मंगळवार, दि. ५ मे रोजी घडली. याप्रकरणी मस्के यांनी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलीसांनी गुन्ह्याची नोंद घेत पुढील तपास सुरू केला आहे. मोंढा बाजार परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात येत असून, संशयितांचा शोध घेण्यासाठी पोलीसांनी तपासाची गती वाढवली आहे.

### मुंबईतील कुटुंबाच्या मृत्यूबाबत महत्त्वाची अपडेट, मुघल बिल्डिंग मधील उंदरांशी कनेक्शन

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईच्या पायधुनी परिसरात काही दिवसांपूर्वी एका कुटुंबाचा संशयास्पदरित्या मृत्यू झाला होता. पायधुनीच्या घाटी मोहल्ल्यातील मोगल उमरट्टी इमारतीमध्ये ही घटना घडली होती. अब्दुल्ला डोकाडिया (४०), नसरीन डोकाडिया (३५) आणि त्यांच्या मुली आयशा (१६) व झैनब (१३) अशी मृतांची नावे आहेत. या चौघांना विषबाधा झाली होती आणि उलट्या-जुलाब होऊन या सगळ्यांचा मृत्यू झाला होता. या सगळ्यांच्या मृत्यूपर्वी त्यांच्या घरी नातेवाईक आले होते. या सगळ्यांनी मिळून बिर्याणी खाल्ली होती. सगळे नातेवाईक घरी गेल्यानंतर डोकाडिया कुटुंबाने कलिंगड खाल्ले होते. याच कलिंगडातून त्यांना विषबाधा झाली असावी, असा अंदाज सुरुवातीला व्यक्त करण्यात आला होता. मात्र, नुकत्याच समोर आलेल्या फॉरेन्सिक अहवालात या चौघांचा मृत्यू कलिंगड किंवा बिर्याणीतील विषबाधेमुळे नव्हे तर विषारी पदार्थामुळे झाल्याचे स्पष्ट झाले होते. या चौघांच्या अंतर्गत अवयवांमध्ये (यकृत, मूत्रपिंड, प्लीहा यांचे नमुने), पोटातील अन्न, पित्त आणि पोटातील चरबीच्या नमुन्यांमध्ये झिंक फॉस्फाइड आढळून आले होते. तसेच घरात आढळलेल्या कलिंगडातही झिंक फॉस्फाइड आढळून आले होते. हे झिंक फॉस्फाईड उंदीर मारण्याच्या औषधात असते. याप्रकरणात आता आणखी एक नवीन अपडेट समोर आली आहे. डोकाडिया कुटुंब राहत असलेल्या घरातून उंदीर मारण्याचे औषध सापडले आहे. उंदीर मारण्याच्या दोन वड्या आणि उंदीर मारण्याचा स्प्रे घरातून जप्त करण्यात आला आहे.

उंदीर मारण्याच्या वड्यांच पाकीट सीलबंद अवस्थेत असून स्प्रेचा वापर झाल्याचे तपासात समोर आले आहे. मुघल बिल्डिंगमध्ये मोठ्याप्रमाणावर उंदीर आहेत. डोकाडिया कुटुंबातील चौघांचाही मृत्यू उंदीर मारण्याच्या औषधाने झाल्याचे एफएसएलच्या चाचणीत समोर आले आहे.

हे औषध डोकाडिया कुटुंबाच्या शरीरात कसे गेले, हे मात्र अद्याप कळू शकलेले नाही. त्यामुळे हा घातपात असावा की आत्महत्या अशी चर्चाही रंगली आहे. अब्दुल्ला व आयेशा यांचा उपचारादरम्यान जबाब नोंदविण्यात आला होता. त्यांनीही बिर्याणी नंतर कलिंगड खाल्ल्याचे म्हटले होते. तसेच आत्महत्या करत असल्याबाबत किंवा कुणावर संशय व्यक्त करणारी काहीही माहिती त्यामधून समोर आलेली नव्हती. जे. जे. मार्ग पोलिसांच्या म्हणण्यानुसार आतापर्यंत केलेल्या तपासात कुठलीही संशयास्पद बाब समोर आलेली नाही.एफडीएच्या रिपोर्टमध्येही अधिकाऱ्यांनी डोकाडियांच्या घरातील वेगवेगळ्या ११ पदार्थांचे नमुने घेतलेले होते. यामध्ये रात्रीची बिर्याणी, कलिंगडाचे तुकडे, फ्रीजमधील पाणी, तांदूळ, चिकन, खजूर आणि मसाल्यांचा समावेश होता.

या सर्व पदार्थामध्ये कोणतेही विषारी द्रव्य आढळून आले नव्हते.

### जगावर महा-एल निनोचं संकट! १५० वर्षांपूर्वी जे घडलं त्याचीच यंदा पुनरावृत्ती होणार

नवी दिल्ली : 'एल निनो'ची एक संभाव्यत: तीव्र घटना जागतिक चिंतेचे कारण बनली आहे. कारण येऊ घातलेला अल निनो हा शतकातला सर्वात तीव्र असू शकतो, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे. शिवाय त्याचा परिणाम जगभरात भयानक परिस्थिती निर्माण करण्यास कारणीभूत ठरणार असल्याचीही शक्यता आहे. सुरुवातीच्या अंदाजानुसार, ही घटना १८७७-७८ मधील त्या विनाशकारी पर्वाशी बरोबरी करू शकते. किंबहुना, त्याहूनही अधिक तीव्र ठरू शकते जे मानवी इतिहासातील सर्वात प्राणघातक हवामान घटनांपैकी एक मानले जात आहे. त्या ऐतिहासिक 'एल निनो' घटनेमुळे जगाच्या मोठ्या भागामध्ये तीव्र उष्णतेच्या लाटा, दीर्घकालीन दुष्काळ, पिकांचे नुकसान आणि भीषण अन्नटंचाई (दुष्काळ) निर्माण झाली होती. यामुळे लाखो लोकांचा बळी गेला, ज्यांची संख्या त्या काळातील एकूण जागतिक लोकसंख्येच्या सुमारे ४ज्ञब इतकी असल्याचा अंदाज आहे. एण्ऐंइ या युरोपियन देशातील वेधशाळेने हा अंदाज व्यक्त करत भीती व्यक्त केली आहे.

जगभरातील हवामान तज्ज्ञांनी यंदाच्या वर्षाच्या उत्तरार्धात 'सुपर एल निनो' येण्याची शक्यता व्यक्त केली आहे. हा एल निनो अत्यंत तीव्र असू शकतो आणि त्याचा परिणाम जगातील अनेक देशांसह भारतावरही होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे याबाबत भारताने चिंता करावी का? असा प्रश्नही निर्माण झाला आहे. भारतासाठी धोके विशेषत: मोठे आहेत. देशाची कृषी, जलस्रोत आणि एकूण अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर मान्सूनवर अवलंबून आहे, आणि एल निनोच्या घटनांमुळे मान्सून कमकुवत होतो हे सर्वश्रुत आहे.

दरम्यान, २०२६ मध्ये एखादी तीव्र घटना घडल्यास, मान्सूनच्या हंगामात सामान्यपेक्षा कमी पावसासोबतच उत्तर, मध्य आणि पूर्व भारतात तीव्र आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या उष्णतेच्या लाटा येऊ शकतात. या एकत्रित परिणामांमुळे पाणीपुरवठ्यावर ताण येऊ शकतो, पिकांचे उत्पन्न घटू शकते आणि अन्नधान्याच्या किमती वाढू शकतात. तीव्र उष्णता आणि आर्द्रतेमुळे शहरी भागांना आरोग्याच्या वाढत्या धोक्यांचाही सामना करावा लागू शकतो. अल निनोचा धोका लक्षात घेता या पार्शवभूमीवर कृषी विभागाने कमी पावसात अधिक उत्पन्न देणाऱ्या पीक पद्धतीचे शेतकऱ्यांना प्रशिक्षण द्यायला सुरवात केली. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पा अंतर्गत हवामान अनुकूल तंत्रज्ञान वापरणे, रुंद वरंभे पद्धतीने पिकाची लागवड कशी करणे यासाठी नागपूर कडक उन्हात कृषी अधिकारी शेतकऱ्यांच्या बांधावर शेतकऱ्यांना प्रशिक्षण देत आहेत. या माध्यमातून येणाऱ्या खरीप हंगामात अल निनोच्या प्रभावाशी लढता येऊन कमी पावसात देखील अधिक उत्पन्न कसे घेता येईल, यासाठी सरकारचा प्रयत्न करत असल्याचे कृषी अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. अल निनोचा ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात सर्वाधिक परिणाम. सरासरीपेक्षा कमी पाऊस यंदाच्या पावसाळ्यात असेल.

# लातूर शहर महानगरपालिकेचा 'मिशन कर्मयोगी' अंतर्गत राज्यात डंका

## iGOT' कर्मचारी /अधिकारी नोंदणी व प्रशिक्षण उपक्रमात महाराष्ट्रात द्वितीय क्रमांक. आयुक्त श्रीमती मानसी यांचा मंत्रालय, मुंबई येथे विशेष गौरव.

**लातूर/प्रतिनिधी :** भारत सरकारच्या 'मिशन कर्मयोगी' अंतर्गत राबविण्यात आलेल्या 'महासाधना सप्ताह' (०२ मे ते १० मे २०२६) दरम्यान, ळत्रञ्जढ प्रणालीवरील नोंदणी आणि प्रशिक्षण उपक्रमात लातूर शहर महानगरपालिकेने संपूर्ण महाराष्ट्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. २५० ते १४९९ कर्मचारी/अधिकारी नोंदणी असलेल्या १०१ कार्यालयांच्या गटात लातूर मनपाने राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

या दैदीप्यमान यशाबद्दल दिनांक ०८ मे २०२६ रोजी, मुंबई येथील मंत्रालय मुख्य इमारतीतील त्रिमूर्ती प्रांगणात आयोजित ढशलह वारी २.० या विशेष कार्यक्रमात लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती मानसी यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

साधना सप्ताह २०२६ हा उपक्रम सरकारी कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करून प्रशासकीय कामात गुणात्मक सुधारणा करण्याच्या उद्देशाने राबवण्यात आला. यामध्ये देशातील ९३ हून अधिक केंद्रीय मंत्रालये, सर्व राज्ये आणि २०० हून अधिक प्रशिक्षण संस्थांनी सहभाग नोंदवला होता. या जागतिक स्तरावरील स्पर्धेत लातूर मनपाने आपले स्थान अधोरेखित केले आहे.

या यशाबद्दल बोलताना आयुक्त श्रीमती मानसी आणि उपायुक्त पंजाब खानसोळे यांनी आनंद व्यक्त केला. या मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावणारे सिस्टिम मॅनेजर (ई-प्रशासन) प्रवीण इंगळे व त्यांच्या चमूच्या परिश्रमाबद्दल आयुक्तांनी समाधान व्यक्त करून त्यांचे विशेष कौतुक केले.

डिजिटल इंडिया आणि मिशन कर्मयोगीच्या माध्यमातून प्रशासकीय कामात पारदर्शकता आणि वेग आणण्यासाठी आमचे कर्मचारी कटिबद्ध आहेत. या पुरस्कारामुळे लातूर मनपाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. असे मत मनपा आयुक्त श्रीमती



मानसी यांनी व्यक्त केले.या यशामुळे लातूर शहर महानगरपालिकेचे संपूर्ण महाराष्ट्रात कौतुक होत आहे.

# शेळके कुटुंबाचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्याकडून सांत्वन

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा सहकारी बोर्ड चे माजी चेअरमन तथा मांजरा साखर कारखान्याचे माजी संचालक ज्ञानोबा शेळके (मामा) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले त्याबद्दल राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांनी त्यांच्या ममदापुर येथील निवासस्थानी भेट देऊन ज्ञानोबा शेळके यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली कुटुंबाचे सांत्वन केले यावेळी सतीश शेळके, कन्या सुषमा गणेश शेळके उपस्थित होते.



याप्रसंगी राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील जागृति शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख रेणा साखर कारखान्याचे अध्यक्ष अनंतराव देशमुख पंचायत समिती सभापती श्री बैले, जनार्धन वंगवाड संभाजी रेड्डी सतीश पाटील सचिन दाताळआदी उपस्थित होते.

# शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्याकडून दहावीतील यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन

**मुंबई/प्रतिनिधी :** दहावीच्या निकालाचा क्षण हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासा-तील एक महत्त्वाचा टप्पा असतो. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) परीक्षेचा निकाल मंडळामार्फत जाहीर करण्यात आला असून यशस्वी विद्यार्थ्यांचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी अभिनंदन केले. या परीक्षेत ज्यांना अपेक्षित यश मिळाले नाही, त्यांनी खचून न जाता पुन्हा प्रयत्न करावेत, शासन आपल्या पाठिशी आहे, असा विश्वास त्यांनी या विद्यार्थ्यांना दिला.



मंत्री दादाजी भुसे यांनी ज्या विद्यार्थ्यांनी आपल्या अथक परिश्रमाने आणि जिद्दीने या परीक्षेत दैदीप्यमान यश संपादन केले आहे, अशा सर्व विद्यार्थ्यांबरोबरच त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहणारे शिक्षक आणि माता-पिता यांचेही विशेष अभिनंदन केले. विद्यार्थी हे महाराष्ट्राचे भविष्य आहेत. त्यांच्या कर्तृत्वाने त्यांच्याबरोबरच राज्य आणि देश निश्चितच प्रगती करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

या परीक्षेत अपेक्षित यश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना दिलासा देताना एका परीक्षेचा निकाल तुमचे संपूर्ण आयुष्य किंवा तुमची बुद्धिमत्ता ठरवू शकत नाही. ही पहिली पायरी आहे. त्यामुळे खचून न जाता पुन्हा प्रयत्न करा. शासन तुमच्या पाठीशी आहे. फेरपरीक्षेची संधी उपलब्ध असल्याने तिचा लाभ घ्या, असेही त्यांनी म्हटले आहे.

निकालाची वैशिष्ट्ये

या परीक्षेत राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून एकूण १५,५५,०२६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १५,४२,४७२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून १४,२०,४८६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्णतेची टक्केवारी ९२.०९ इतकी आहे.

मुलींचे उत्तीर्ण होण्याची टक्केवारी अधिक

दहावीची परीक्षा दिलेल्या एकूण ८,२०,४२७ मुलांपैकी ७,३४,८१४ मुले (८९.५६ टक्के) तर एकूण ७,२२,०४५ मुलींपैकी ६,८५,६७२ मुली (९४.९६ टक्के) उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलींची उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ५.४० ने अधिक आहे.

कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक

सर्व विभागीय मंडळातून नियमित विद्यार्थ्यांचा कोकण विभागाचा निकाल (९७.६२ टक्के) सर्वाधिक असून सर्वात कमी निकाल छत्रपती संभाजीनगर विभागाचा (८८.४१ टक्के) आहे. इतर विभागांमध्ये कोल्हापूर विभागाचा निकाल ९५.४७ टक्के, मुंबई- ९४.९७, पुणे- ९४.२४, नाशिक- ९०.५३, अमरावती- ९०.५०, नागपूर- ८९.०७ तर लातूर विभागाचा निकाल ८८.४२ टक्के लागला आहे.

श्रेणीनिहाय निकाल

एकूण उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये प्राविण्यासह प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण २७.४१ टक्के, प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण ३१.२६ टक्के, द्वितीय श्रेणीमध्ये २४.६६ टक्के तर उत्तीर्ण श्रेणीमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण ८.७५ टक्के इतके आहे.

श्रेणीसुधार गुणसुधार योजना

परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची संपादणूक सुधारण्यासाठी श्रेणी गुणसुधार योजनेअंतर्गत लगतच्या तीन परीक्षांमध्ये पुन:श्च प्रविष्ट होता येईल. फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या परीक्षेस प्रविष्ट होऊन सर्व विषयात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना (एकाच वेळी सर्व विषय घेऊन प्रविष्ट होणाऱ्या) जून-जुलै २०२६, फेब्रुवारी-मार्च २०२७, जून-जुलै २०२७ च्या दहावीच्या परीक्षेस 'श्रेणीसुधार गुणसुधार' साठी प्रविष्ट होण्यास तीन संधी देण्यात येत असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत देण्यात आली आहे.

# मुंबई-बंगळुरु प्रवाशांसाठी 'गुड न्यूज', सुपरफास्ट ट्रेनला हिरवा कंदील; 'वंदे भारत स्लीपर' ट्रेन सुद्धा धावणार



**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई- बंगळुरू प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या दृष्टीने एक आनंदाची बातमी आहे. लवकरच मुंबई- बंगळुरू मार्गावर सुपरफास्ट ट्रेन धावणार आहे. अलीकडेच केंद्रीय अन्न आणि ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी या सुपरफास्ट ट्रेनला मंजुरी दिली आहे. येत्या जून अखेरपर्यंत ही सुपरफास्ट ट्रेन प्रवाशांच्या सेवेमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. इतकंच नाही तर, प्रवाशांच्या सेवेमध्ये वंदे भारत एक्स्प्रेस सुद्धा येण्याची शक्यता आहे.

कर्नाटकसंबंधित अनेक रेल्वे पायाभूत सुविधा प्रकल्प आणि कनेक्टिव्हिटीच्या मागण्यांसंदर्भात केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासोबत चर्चा केल्यानंतर प्रल्हाद जोशी यांनी ही घोषणा केली. प्रल्हाद जोशी यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबई- बंगळुरू मार्गावर येत्या काही दिवसांमध्ये सुरू होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे कर्नाटक आणि महाराष्ट्र दरम्यान प्रवाशांच्या सेवेमध्ये जलद आणि अधिक कार्यक्षम रेल्वे संपर्क उपलब्ध होईल, असे आश्वासन रेल्वेमंत्र्यांनी प्रल्हाद जोशी यांना दिले आहे.

प्रल्हाद जोशी यांनी दिलेल्या माहितीनुसार, नवीन सुपरफास्ट ट्रेन मध्य कर्नाटक कॉरिडॉरमधून धावेल. ही ट्रेन महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन प्रमुख राज्यांमधील रेल्वे कनेक्टिव्हिटीला अभूतपूर्व चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. ही ट्रेन कर्नाटकातील अनेक महत्त्वाच्या शहरांना जोडणार आहे. या मार्गामध्ये प्रामुख्याने तुमकूर, दावणगेरे, हावेरी, हुबळी-धारवाड आणि बेळगाव यांसारख्या प्रमुख जिल्ह्यांचा समावेश आहे. यामुळे प्रवाशांना थेट मुंबईपर्यंत पोहोचण्यासाठी एक उत्तम आणि वेगवान पर्याय उपलब्ध होणार आहे.

या सेवेमुळे कर्नाटक आणि महाराष्ट्रमधील संपर्क अधिक सुधारेल, हे नक्की. डेक्कन हेराल्डने दिलेल्या वृत्तानुसार, सध्या बंगळूरु आणि मुंबई दरम्यान प्रवास करणारे अनेक प्रवासी रेल्वे प्रवासावर किंवा विमान प्रवासावर अवलंबून आहेत. या नवीन सेवेमुळे व्यावसायिक प्रवासी, विद्यार्थी, पर्यटक आणि दैनंदिन प्रवास करणाऱ्यांसाठी प्रवासाची गैरसोय कमी होऊन एक जलद पर्याय उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. या नवीन सुपरफास्ट ट्रेनसोबत प्रवाशांच्या सेवेमध्ये एक स्लीपर वंदे भारत एक्स्प्रेस सुद्धा येणार असल्याचे बोलले जात आहे.या बैठकीमध्ये आणखी एका निर्णयावर चर्चा करण्यात आली. सुपरफास्ट ट्रेननंतर मुंबई- बंगळुरू मार्गावर स्लीपर वंदे भारत एक्स्प्रेस सुद्धा चालवली जाणार असल्याचे बोलले जात आहे. प्रल्हाद जोशी यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबई- बंगळुरू मार्गावर भविष्यात 'वंदे भारत एक्स्प्रेस स्लीपर' ट्रेनची सेवा सुरू करण्याच्या प्रस्तावाला रेल्वे मंत्रालयाने अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. रेल्वे मंत्रालयाकडून जर, 'वंदे भारत स्लीपर'चा प्रस्ताव मंजूर झाला, तर भारतीय रेल्वेच्या आधुनिकीकरण मोहिमेचा भाग म्हणून प्रवाशांना मोठा फायदा होईल. यामुळे आधुनिक स्लीपर कोच, जागतिक दर्जाच्या सुविधा आणि दोन महानगरांदरम्यान अत्यंत आरामदायी व सुरक्षित प्रवास अनुभवता येणार आहे.

# लातूर जिल्ह्यात पाणी टंचाई निवारणासाठी उपाययोजना; जिल्ह्यात ३५ खासगी विहिरी, विंधन विहिरींचे अधिग्रहण

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये, यासाठी जिल्हा प्रशासनाने पाणी टंचाई निवारण आराखड्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या ७ मे २०२६ रोजीच्या दैनंदिन अहवालानुसार, सध्या जिल्ह्यातील जळकोट तालुक्यात २ टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे. तसेच जिल्ह्यात ३५ विहीर, विंधन विहीर अधिग्रहणाद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. जळकोट तालुक्यातील ३ गावे आणि १ वाडी मिळून एकूण ३,३१० लोकसंख्येला २ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. यामध्ये शिवाजी नगर तांडा व वाघमारी तांडा येथे टँकरने पाणीपुरवठा सुरु आहे. गव्हाण येथेही २४ एप्रिल २०२६ पासून टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. यासाठी २ शासकीय टँकरद्वारे दररोज ४ खेपा पूर्ण केल्या जात आहेत. टँकर व्यतिरिक्त ज्या ठिकाणी शक्य आहे, तिथे प्रशासनाने खाजगी विहिरींचे अधिग्रहण करून पाणीपुरवठा सुरू केला आहे. जिल्हभरात एकूण ३५ खाजगी विहिरी, विंधन विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. यामध्ये औसा तालुक्यातील १० गावे तथा वाड्यांसाठी ११ विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत, तर अहमदपूर तालुक्यातील १० गावांमध्ये १० विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. उदगीर तालुक्यात ८ गावे तथा वाड्यांसाठी ८ विहिरी अधिग्रहित केल्या आहेत. रेणापूर व चाकूर तालुक्यात प्रत्येकी १ गावात विहीर अधिग्रहण करण्यात आले आहे, तर जळकोट तालुक्यात टँकर भरण्यासाठी ३ आणि इतर २ अशा एकूण ५ विहिरी अधिग्रहित केल्या आहेत.

# नंदादीप माध्यमिक विद्यालयाचे एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत घवघवीत यश

**लातूर/प्रतिनिधी :** येथील कातळे नगर भागातील नंदादीप माध्यमिक विद्यालयाने एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत घवघवीत यश मिळवत शाळेचा एकूण ९७% टक्के निकाल लागला असून विशेष प्राविण्या सह २० तर प्रथम श्रेणीत २१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या समाधानकारक निकालोने शाळेच्या उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव कालिदास माने तसेच संस्थेचे मुख्यकार्यकारी अधिकारी मनोज भैय्या माने व प्रशासकीय अधिकारी गोविंदराव माने, शाळेचे मुख्याध्यापक राऊत श्रीनिवास, चव्हाण अनिता, गवंडे गोविंद, चिंचकुटे बळीराम, गोरे प्रशांत, पुरी सीता, कापसे शिवनंदा, कदम सोनाली, गवळी अरुण, नागरगोजे शंकर, बिरादार ईश्वर, सुडे दत्ता व पालकांनी अभिनंदन केले, विद्यार्थ्याच्या या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांचे सहकार्य महत्वाचे ठरल्याचे मत मुख्याध्यापकांनी व्यक्त केले.यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार लवकरच आयोजित करण्यात येणार असून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

# श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांनी पटकावले 100 टक्के गुण

**लातूर/प्रतिनिधी :** येथील अभिनव मानव शिक्षण संस्था द्वारा संचालित श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण संपादन केले आहेत. तर ८८ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा अधिक गुण संपादन केले आहेत. मागच्या १५ वर्षांपासून विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची दैदिप्यमान परंपरा कायम राखली आहे.

श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या समर्थ कल्याण गिरवलकर,अथर्व संतोष मरे , अनुराग नेताजी सावंत आणि अथर्व राजाराम कात्रे या चार विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. विद्यालयाच्या एकूण १९३ विद्यार्थ्यांपैकी १५८ विद्यार्थ्यांनी विशेष गुणवत्ता संपादन करण्यात यश मिळवले आहे. संस्कृत, गणित आणि विज्ञान, इतिहास भूगोल या विषयात अनुक्रमे ३२, ०२, ०१ आणि ०१ विद्यार्थ्यांनी १०० गुण संपादन केले आहेत. विद्यालयातील ९२ विद्यार्थ्यांनी ९० ते ९९. ९ टक्के गुण परंपरा केले आहेत. ६६ विद्यार्थ्यांनी ७५ ते ८९. ९ टक्के , २७ विद्यार्थ्यांनी ६० ते ७४. ९ टक्के तर ७ विद्यार्थ्यांनी ४५ ते ५९. ९ टक्के गुण मिळवले आहेत. विद्यालयाचा त्यावर्षीचा इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल ९९. ४८ टक्के लागला आहे.

मागील १५ वर्षांपासून श्रीकिशन सोमाणी विद्यालयाने दहावीच्या निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, कोषाध्यक्ष जयेश बजाज, शालेय समिती अध्यक्ष अतुल देऊळगावकर, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी, पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, सुनिता जाधव, राहुल पांचाळ यांसह सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# महिलांवरील अत्याचारांस ह इतर गुन्ह्यांमुळे पुण्याची प्रतिमा मलिन होतेय-सुप्रिया सुळे

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** खासदार सुप्रिया सुळे यांनी कोल्हापुरात पत्रकारांशी संवाद साधताना विविध राजकीय आणि सामाजिक विषयांवर भाष्य केलं. राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा पवार यांच्याबाबत त्यांचे पुत्र जय पवार यांनी केलेल्या वक्तव्याची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. ''२०२९ च्या निवडणुकीनंतर सुनेत्रा पवार महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री होतील,'' असे वक्तव्य जय पवार यांनी केले होते. यावर प्रतिक्रिया देताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, ''सुनेत्रा पवार वहिनी जर राज्याच्या मुख्यमंत्री झाल्या, तर त्यांना पहिला हार मीच घालेन''. तपास प्रक्रियेत होणारा गोंधळ वाढत चालला : नाशिक येथील निदा खान प्रकरणाबाबत बोलताना सुळे म्हणाल्या की, ''या प्रकरणाचा तपास पूर्ण होऊ द्या. राज्यात महिलांवरील अत्याचार, भ्रष्टाचार आणि तपास प्रक्रियेत होणारा गोंधळ वाढत चालला आहे. मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, हे प्रकरण अत्यंत गंभीर आहे. अशा प्रकरणांमध्ये आम्ही कधीही राजकारण केले नाही. महिला आणि नागरिकांची सुरक्षितता ही कोणत्याही सरकारची जबाबदारी असते.''

# विलासराव देशमुख फाउंडेशनच्या ४४ विद्यार्थ्यांची नामांकित फार्मा कंपन्यांमध्ये निवड

## ● पुणे आणि गोव्यातील कंपन्यांकडून कॅम्पस प्लेसमेंट ● माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांच्याकडून कौतुक

**लातूर/प्रतिनिधी :** येथील विलासराव देशमुख फाउंडेशन, स्कूल ऑफ फार्मसीमधील बी. फार्मसी आणि एम. फार्मसीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या कॅम्पस ड्राइव्हमध्ये ४४ विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड करण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी या मुलाखतींचे आयोजन करण्यात आले होते.

नामांकित कंपन्यांचा सहभाग झाला या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये पुणे आणि गोव्यातील आघाडीच्या फार्मा कंपन्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये एजीआयवो फार्मास्युटिकल प्रायव्हेट लिमिटेड, पुणे, एवरसुअर पॉलीबॉंड फार्मा प्रायव्हेट लिमिटेड, पुणे, जेनो फार्मा प्रायव्हेट लिमिटेड, गोवा या कंपन्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर आधारित निवड करण्यात आली. या मोहिमेत १०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. बी. एस. वाकुरे यांनी सांगितले की, महाविद्यालयात दरवर्षी नियमितपणे आयोजित केल्या जाणाऱ्या अशा कॅम्पस मुलाखतींमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना थेट नामांकित कंपन्यांमध्ये संधी उपलब्ध झाल्यामुळे त्यांच्या करिअरला योग्य दिशा मिळत आहे.

या मुलाखत प्रक्रियेत मानव संसाधन अधिकारी माधव साखरे, ज्ञानेश्वर घाटोळे, संतोष स्वामी, गणेश कांबळे यांनी विद्यार्थ्यांची निवड केली.

यावेळी ट्रेनिंग व प्लेसमेंट ऑफिसर प्रा. गादा एस. एन., प्राचार्य डॉ. बी. एस. वाकुरे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष, माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख आणि संचालक मंडळाने अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. गादा एस. एन., डॉ. साळुंके एम. ए. व सर्व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.